# Greenlawns School, Worli

**सहामाही परीक्षा (प्रथम सत्र २४-२५)**

**मराठी**

**इयत्ता :- ९ वी** **पूर्णांक:- ८०**

**दिनांक:- ०४.१०.२०२४** **वेळ –२ तास**

**सूचना :- सगळे प्रश्न अनिवार्य आहेत.**

**शुद्ध भाषा व सुवाच्य लेखन अपेक्षित आहे.**

---

**प्रश्न १) खालील पैकी एका विषयावर निबंध लिहा :-.** **(१०)**

१. प्रगतीपुस्तकाचे मनोगत

२. मला कोण व्हावेसे वाटते

३. आई संपावर गेली तर

**प्रश्न २) खालील दिलेल्या विषयावर पत्र लिहा :** **(७)**

**'दिवाळी पहाट' या कार्यक्रमाची तिकिटे संपल्यामुळे हाच कार्यक्रम पुन्हा सादर करण्याची मागणी करणारे पत्र लिहा.**

**प्र. ३) खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

एक राजा होता. त्याच्या धर्मनगर राज्यातील प्रजा अत्यंत सुखी होती. राजा आपल्या राज्यात निरनिराळ्या स्पर्धांचे आयोजन करीत असे आणि विजेत्यांना मान-सन्मान व बक्षिसे देत असे. यामुळे प्रजा नेहमी उत्साही राहत असे.यावेळी राजाने राजपुरूष निवडण्याची स्पर्धा ठेवली होती. त्यासाठी त्याने एक बाग तयार केली होती. या बागेत जगातील साऱ्या वस्तू ठेवल्या होत्या. प्रत्येक वस्तूची किंमत वेगवेगळी होती. पण त्या वस्तूंवर त्यांच्या किमती लिहिलेल्या नव्हत्या. राजाने जाहीर केले होते की या बागेतून जो सर्वात मौल्यवान वस्तू घेऊन बाहेर येईल त्याला या वर्षीचा राजपुरूष घोषित केला जाईल. लोक बागेत जात आणि स्वतःला जी वस्तू मौल्यवान वाटे ती घेऊन बाहेर येत असत. कोणी हिरे- जवाहिरे आणले, तर कोणी ग्रंथ आणले. एक गरीब माणूस तर भाकरीच घेऊन बाहेर आला. त्याच्या दृष्टीने तीच मौल्यवान

होती. एक देवभक्त देवाची मूर्ती घेऊन आला. त्याला देवाची मूर्तीच सर्वात मोलाची वाटली होती. या लोकांमध्ये एक योगीही होता. तो बागेत सर्वत्र फिरला. त्याने साऱ्या वस्तू पाहिल्या. कोणतीही वस्तू न घेताच तो बाहेर आला.राजाने सर्वांनी आणलेल्या वस्तू पाहिल्या. जेव्हा योगीची पाळी आली तेव्हा राजाने विचारले, "तुम्ही काय आणले योगी महाराज?" "मी संतोष आणला आहे महाराज." योगी म्हणाला. "तुमचा संतोष सर्वात मौल्यवान आहे का?" राजाने विचारले. योगींनी उत्तर दिले, "होय महाराज, या बागेत आपण जेवढ्या वस्तू ठेवल्या आहेत त्या मिळवून माणसाला संतोष मिळतो. तो पूर्ण संतोष नसतो. तो अर्धाच संतोष असतो. या वस्तू हरवल्याने त्या माणसाचा संतोष राहत नाही. संतोषचा केंद्रबिंदू मन आहे. ज्याचे मनावर नियंत्रण असते. त्याच्याकडेच सर्वात मौल्यवान वस्तू असते. " राजा योगीचे विचार ऐकून प्रसन्न झाला. राजाने राजपुरूष म्हणून योगीचे नाव जाहीर केले.

**प्रश्न:-**

**१.धर्मनगरची प्रजा नेहमी का उत्साही राहत असे ? (२)**

**२. राजांनी राजपुरूष निवडण्यासाठी काय केले ? (२)**

**३. बागेतून लोक कोणकोणती वस्तू घेऊन बाहेर आले ? (२)**

**४. राजाने राजपुरूष कोणाला बनविले व का ? (२)**

**५. वाक्य वनवा : नेहमी, मूर्ती (२)**

## <u>व्याकरण - विभाग</u>

**प्रश्न ४) खालील दिलेल्या निर्देशानुसार योग्य उत्तरे निवडून लिहा :-**

**१. समानार्थी शब्द लिहा :- (२)**

**१. प्रवृत्ती**

**a. सूभव b. स्वभाव c. स्वभावा d. स्वाभाव**

**२. संपदा**

**b. संपप्ती b. संतती c. संपत्ती d.संपाती**

२. विरुद्धार्थी शब्द लिहा :- (२)

. १. श्रेष्ठ

a. कनिष्ठ b.कनिष्क c.कानिष्ट d. कनीस्ठ

२.विशालकाय

a. लगुकाय b. लघूकाय c. लागूकाय d. लघुकाय

३. लिंग ओळखा :- (२)

१. कीटक

a. पुल्लिंग b. स्त्रीलिंग c. नपुसकलिंग d.वरील काही नाही

२. बातमी

b. पुल्लिंग b.स्त्रीलिंग c. नपुसकलिंग d. वरील काही नाही

४. वचन बदला :- (२)

१. तुतारी

a. तुतारे b. तूताऱ्या c. तुतऱ्या d. तुताऱ्या

२. मशाल

a. मशले b. मशाले c. मशाली d.मसाल्या

५. खालील वाक्यात अविकारी शब्द शोधून त्याचा प्रकार लिहा :- (३)

१. वाहवा ! काय सुंदर देखावा आहे हा .

२. मी खुर्चीवर बसलो.

३. इसाब किंवा अमृत तुमच्याशी लढेल.

६. खालील वाक्यात काळ ओळखा. (२)

१.आई गावाहून चार-पाच दिवसात परत येईल.

२.मुलांनी फुगेवाल्याभोवती गर्दी केली.

## साहित्य - विभाग ( Marks – ४० )

प्रश्न ५ ) अ) खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :- (९)

१. तुम्हाला समजलेले सखू आजीचे व्यक्तिचित्र लिहा.

२. बांबूंच्या निरनिराळ्या जाती गोळा करण्यात एडिसनच्या सहकाऱ्यांना आलेल्या अडचणी सांगा तसेच एडिसनच्या व्यक्तिमत्त्वाचे गुणविशेष लिहा.

३. शिरीषची भूमिका तुम्हाला कोणता संदेश देते, ते तुमच्या शब्दात लिहा.

आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (५)

१. लेखकाचा कोणता पहिलाच जाहीर कार्यक्रम आहे ?

२. कोणत्या दिवशी दिव्याच्या शोधाला पन्नास वर्षे पूर्ण झाली ?

३. सखू आजीच्या गावामध्ये पहिल्यांदा झालेल्या पोलिसाचे नाव सांगा?

४. बाहेरचा संमिश्र कोलाहल केव्हा बंद पडला ?

५. “तुला गाण्याची आवड आहे तर!” असे वाक्य कोण-कोणास म्हणाले ते लिहा.

इ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा - (४)

१. ----------- असल्यामुळे भर दिवसा सर्वत्र अंधार पसरला.

२. “ज्या दिवशी नाना गेले त्या दिवशी मी ठरवले की --------- बंद!”

३. प्लेटिनमचा प्रयोग ---------- होता.

४. आमच्या भागात तेव्हा ----------- साक्षरतेचे वर्ग जोरात होते.

ई) एका शब्दात उत्तरे लिहा:- (४)

१. आजीने याचा दंड माफ केला -

२. कमानदार दिवा वापरण्याचे ठिकाण -

३. लेखकांनी यांना खूण केली -

४. या धातूचा महत्त्वपूर्ण शोध एडिसनने लावला -

उ) शब्दार्थ लिहा :- तपश्चर्या , धीटपणा , खर्चीक (३)

## <u>कविता – विभाग</u>

प्रश्न ६) अ) खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहाः- (६)

१. व्यायामाचे महत्त्व तुमच्या शब्दात लिहा.

२. व्यायाम न करण्याचे तोटे लिहा.

आ ) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा. (२)

१. स्वतःची कामे स्वतः करणारा -

२. विरोध करण्याची क्षमता असलेली शक्ती -

आ) पुढील कवितेच्या ओळींचे भावार्थ लिहा : (२)

करुणाकरा करुणा तुझी
असतात मला भय कोठले
मार्गावरी पुढती सदा
पाहीन मी तव पावले

इ) शब्दार्थ लिहा : दीर्घायु , अभिवादन , तिमिर, सृजनत्व , राबसी (५)

******* समाप्त *******